# प्रेसनोट दि.२२/०८/२०१७

## सामाजिक सुरक्षा विभागाकडुन कोरेगावपार्क येथील नामांकित कंपनीच्या गेस्ट हाऊस येथे छापा टाकुन चालणा-या वेश्याव्यवसायाचा पर्दाफाश करुन एका मुलींची सुटका

दि.२१.०८.२०१७ रोजी सामाजिक सुरक्षा विभाग, गुन्हे शाखेकडील पो.ना.नितिन तेलंगे यांना बातमीदारांमार्फत बातमी मिळाली की, कोरेगाव पार्क पोलीस स्टेशन हद्दीमध्ये महिलानामे १) अनुजा प्रशांत देशमुख उर्फ स्नेहा दिदी उर्फ सारिका गुंड वय ३२ वर्षे रा.डहाणुकर कॉलनी लेन नं. १० फ्लॅट नं.१० कोथरुड स्टॅन्ड जवळ पुणे ही गेस्ट हाऊसचे केअर टेकर पुरुषनामे २) रणजीत नारायणसिंग रावल वय ४८ रा.कोणार्क पार्क ई बिल्डींग फ्लॅट नंबर ५ ढोले पाटील रोड पुणे मुळगाव – ९५ ग्वालदम स्टेट, जिल्हा -चमोली, राज्य- उत्तराखंड याच्या मदतीने दोघे मिळुन सदर नामांकित कंपनीच्या गेस्ट हाऊस येथे स्वतः राज्यातील व परराज्यातील मुलींना वेश्या व्यवसायाकरीता प्राप्त करुन घेवून त्यांचेकडून कोणार्क पार्क ई बिल्डींग फ्लॅट नंबर ५ ढोले पाटील रोड पुणे येथे वेश्या व्यवसाय करवुन घेतात.

वरील मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष गुन्हे शाखा पुणे शहर या विभागाकडील अधिकारी व कर्मचारी तसेच कोरेगावपार्क पोलीस स्टेशन कडील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी संयुक्तपणे कोणार्क पार्क, ई बिल्डींग, फ्लॅट नंबर ५, ढोले पाटील रोड, पुणे येथे छापा टाकुन १ सज्ञान मुलींची सुटका करुन महिलानामे १) अनुजा प्रशांत देशमुख उर्फ स्नेहा दिदी उर्फ सारिका गुंड वय ३२ वर्षे रा.डहाणुकर कॉलनी लेन नं. १० फ्लॅट नं.१० कोथरुड स्टॅन्ड जवळ पुणे व पुरुषनामे २) रणजीत नारायणसिंग रावल वय ४८ रा.कोणार्क पार्क ई बिल्डींग फ्लॅट नंबर ५ ढोले पाटील रोड पुणे मुळगाव – ९५ ग्वालदम स्टेट, जिल्हा -चमोली, राज्य- उत्तराखंड यांचा गुन्ह्यात सहभाग निष्पन्न झाल्याने त्यांना ताब्यात घेवुन सदर आरोपींच्या विरोधात कोरेगावपार्क पोलीस स्टेशन गुरनं.१५४/२०१७ इटपा कायदा ॲक्ट ३,४,५ नुसार गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

**वरील नमुद कारवाई ही मा.श्री.प्रदिप देशपांडे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, मा.श्री.पंकज डहाणे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे पुणे, मा.संजय निकम, सपोआ, गुन्हे-२, यांचे मार्गदर्शनाखाली पोनि श्री.संजय पाटील, सपोनि चंद्रकांत जाधव, सपोनि शीतल भालेकर ,संजय गिरमे, ननिता येळे, कविता नलावडे, राजेश उंबरे, राजेद्र कचरे, प्रदिप शेलार, सचिन कदम, सचिन शिंदे, नितीन तेलंगे, सरस्वती कागणे यांनी कोरेगाव पार्क पोलीस स्टेशनचे सपोनि श्री.राजेद्र पन्हाळे यांचे मदतीने केलेली आहे.**